5 AUG 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राचार्य, अधिविभागप्रमुखांचा गुणगौरव

## शिवाजी विद्यापीठ : नऊ महाविद्यालयांसह अधिविभागाचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील गुणवत्ता शिष्यवृत्तीप्राप्त गुणवंत महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा व अधिविभागातील अधिविभागप्रमुखांचा बुधवारी गौरव केला. वनस्पतीशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

यावेळी नऊ महाविद्यालयांसह एका अधिविभागाचा गौरव केला. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. ए. एन जाधव उपस्थित होते. अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गौरव केला. डॉ. एस. एन. सपली यांनी हा सन्मान स्वीकारला.

### यांचा झाला गौरव

तंत्रज्ञान अधिविभाग, आण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ बी.फार्मसी, आष्टा (जि. सांगली), संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, महागाव, व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, डी. आर. माने महाविद्यालय, कागल, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर व भोगावती महाविद्यालय, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर, क्रांतीवीर नागनाथअण्णा नाईकवडी कला महाविद्यालय, झरे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क, जकातवाडी, (सातारा).

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाने केला क्रीडाईसमवेत सामंजस्य करार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि कोल्हापूर क्रीडाई यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. उद्योगांना आवश्यक कुशल अभियंते, ज्ञान व तंत्रज्ञान यांची निर्मिती करणे, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देणे असा या कराराचा हेतू आहे.

विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय प्रश्न घेऊन त्या अनुषंगिक प्रकल्प हाती घ्यावेत व त्याची उकल करण्यास क्रीडाई संस्थेच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य उपलब्ध करून द्यावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले. तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना सद्यपरिस्थितीत बांधकामातील ज्वलंत प्रश्नांची जाणीव होऊन, त्यांना प्रत्यक्ष बांधकामाचा अनुभव क्रीडाईच्या माध्यमातून मिळेल, अशी ग्वाही क्रीडाईचे अध्यक्ष के. पी. खोत यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग आणि कोल्हापूर क्रीडाई यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. यावेळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, क्रीडाईचे अध्यक्ष के. पी. खोत, डॉ.पी.एस.पाटील, डॉ.व्ही.एन. शिंदे उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठातर्फे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली व डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी तर क्रीडाईतर्फे अध्यक्ष के.पी. खोत व सचिव संदीप मिरजकर यांनी स्वाक्षरी केल्या. महेश साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पुनश्री फडणीस यांनी आभार मानले. यावेळी डॉ. व्ही. एस. पाटील, श्रीकांत भोसले, गणेश सावंत, विजय माणगांवकर, विश्वजित जाधव व आदित्य बेडेकर उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

कोल्हापूर : क्रांतिसिंह नाना पाटील यांची जयंती गुरुवारी येथील शिवाजी विद्यापीठामध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी वित्त आणि लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. आशिष देशमुख, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. महादेव भिलावे, डॉ. सुनील गायकवाड, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
5 AUG 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि क्रीडाईतील झालेला सामंजस्य करार दाखवताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, क्रीडाईचे अध्यक्ष के. पी. खोत. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, संदीप मिरजकर आदी.

# विद्यापीठाबरोबर क्रीडाईचा सामंजस्य करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

- **कौशल्याधिष्ठीत अभ्यासक्रम आणि कुशल मनुष्यबळ तयार करणे मुख्य उद्देश**

शिवाजी विद्यापीठातील डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी आणि क्रीडाई यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. उद्योगांना आवश्यक कुशल अभियंते, ज्ञान व तंत्रज्ञानाची निर्मिती निर्माण करणे, विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण देणे असा या सामंजस्य कराराचा हेतू आहे. विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. एस. एन. सपली व डॉ. जी. एस. कुलकर्णी आणि क्रीडाईतर्फे अध्यक्ष के. पी. खोत, सेक्रेटरी संदीप मिरजकर यांनी स्वाक्षरी केली.

विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय प्रश्न घेवून त्या अनुषंगिक प्रकल्प हाती घ्यावेत व त्याची उकल क्रीडाई संस्थेच्या माध्यमातून करावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना सद्यपरिस्थितीत बांधकामातील ज्वलंत प्रश्नांची जाणीव होवून, त्यांना प्रत्यक्ष बांधकामाचा अनुभव क्रीडाईच्या माध्यमातून मिळेल, असे मत क्रीडाई अध्यक्ष के. पी. खोत यांनी व्यक्त केले. प्र-कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी सिव्हील शाखेचे समन्वयक महेश साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पुनश्री फडणीस यांनी आभार मानले. यावेळी सिव्हिल शाखेचे डॉ. व्ही. एस. पाटील, श्रीकांत भोसले, क्रीडाईचे जॉईंट सेक्रेटरी गणेश सावंत, विजय माणगांवकर, आदी उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात बॅ. खर्डेकर जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर केंद्रामध्ये बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती साजरी झाली.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केले. प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. वी. बनसोडे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सचिनकुमार पाटील, डॉ. डी.बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात जैनालॉजी अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनामार्फत पीजी डिप्लोमा इन जैनालॉजी अँड प्राकृत व सर्टिफिकेट कोर्स इन जैनालॉजी अँड प्राकृत २०२३-२४ या वर्षाकरिता प्रवेश सुरू झाला आहे. बारावी उत्तीर्ण व पदवीधारक यासाठी पात्र आहेत. जैनधर्म इतिहास, तत्त्वे व प्राकृत भाषा याबाबतचे घटक अभ्यासक्रमात असून गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिली जाणार आहे. या अभ्यासक्रमास सर्व जाती-धर्मातील विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. विद्यापीठाच्या वेबसाईटवरून https:/// sukapps. unishivaji. ac. in/ pgentrance/#/ login या लिंकद्वारे ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. अधिक माहितीसाठी प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत

# 'जैनशास्त्र'साठी प्रवेश प्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनामार्फत पीजी डिप्लोमा इन जैनशास्त्र व जैनशास्त्र सर्टिफिकेट कोर्स या अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू झाले आहेत. यासाठी ४,००० रुपये वार्षिक शुल्क आहे. बारावी पास, तसेच पदवीधारक यासाठी पात्र आहेत. जैनधर्म इतिहास, तत्त्वे, तसेच प्राकृत भाषा याबाबतचे घटक अभ्यासक्रमात आहेत. सर्व जाती-धर्मांतील विद्यार्थी याला प्रवेश घेऊ शकतात. विद्यापीठाच्या वेबसाइटवरून https://sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/login या लिंकद्वारे ऑनलाइन नोंदणी करू शकता. नोंदणीचे आवाहन ककडे यांनी केले

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज कॅमेरा हँडलिंगवर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशनच्या वतीने शनिवार (दि.५) रोजी कॅमेरा हँडलिंग या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. देहरादून येथील अ‍ॅकॅडमी ऑफ प्रोफेशनल फोटोग्राफी इन्स्टिट्यूटमधील कॉन्ट्रीब्युटरी टीचर विराज चव्हाण विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ. श्रीकृष्ण महाजन असणार आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये दुपारी दोन वाजता हे प्रात्यक्षिक सुरू होईल. सर्वांसाठी हे प्रशिक्षण खुले असून कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात कॅमेरा हँडलिंगवर कार्यशाळेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशनच्यावतीने आज, शनिवारी कॅमेरा हॅन्डलिंग या विषयावर कार्यशाळा होणार आहे. डेहराडून येथील अकॅडमी ऑफ प्रोफेशनल फोटोग्राफी इन्स्टिट्यूटमधील कॉन्ट्रीब्यूटरी टीचर विराज चव्हाण विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता प्राध्यापक डॉ. श्रीकृष्ण महाजन आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये दुपारी दोन वाजता हे प्रात्यक्षिक सुरू होईल. कार्यशाळेला उपस्थित राहण्याचे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ प्राणिशास्त्र विभागात सेरिकल्चर स्पेशलायझेशन अभ्यासक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात सेरिकल्चर स्पेशलायझेशन अभ्यासक्रम एम.एस्सी. विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. आठवी उत्तीर्ण शेतकरी वर्गाला रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम आहे. पदवीधर विद्यार्थ्यांसाठी रेशीमशास्त्राची पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अर्जाची अंतिम मुदत ३० सप्टेंबर आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राणिशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी केले आहे.

तरूण भारत

# सेरिकल्चर स्पेशलायझेशन प्रवेशासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात सेरिकल्चर स्पेशलायझेशन एम. एस्सी.च्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. याबाबत काहींच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे. प्राणिशास्त्र अधिविभागात सेरिकल्चर स्पेशलायझेशन उपलब्ध आहे. त्यासोबतच आठवी उत्तीर्ण शेतकरी वर्गाला रेशीमशास्त्र पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहे. पदवीधर विद्यार्थ्यांसाठी रेशीमशास्त्राची पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अर्ज करण्याची ३० सप्टेंबरपर्यंत मुदत आहे, तरी इच्छुकांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी केले आहे.

पुढारी

# 'विवेकानंद'च्या तीन खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाची क्रीडा शिष्यवृत्ती

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या तीन खेळाडूंना २०२२-२३ ची शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाची २० हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे. यामध्ये हर्षदा पाटील, सृष्टी कोणुरी, श्रेया पाटील यांचा समावेश आहे.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# विद्यापीठात महानोर यांच्या कवितांचे वाचन

**कोल्हापूर :** रानकवी ना. धो. महानोर यांचे नुकतेच निधन झाले. त्यानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाकडून महानोर यांच्या निवडक कवितांच्या वाचनातून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी महानोर यांना श्रद्धांजली अर्पण करीत मराठी कवितेतील त्यांच्या कवितेचे महत्त्व सांगीतले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे यांनी महानोर यांच्या काही आठवणी सांगितल्या तसेच महानोर यांच्या जीवनप्रवासाचा आढावा घेणारा माहितीपट दाखवण्यात आला. याप्रसंगी डॉ. अरुण शिंदे व डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. सुखदेव एकल, रवी लोंढे व राजेश पाटील उपस्थित होते.

पुण्यनगरी

# 'विवेकानंद'च्या तीन खेळाडूंना शिष्यवृत्ती

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या तीन खेळाडूंना २०२२-२३ ची शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागाची प्रत्येकी २० हजारांची शिष्यवृत्ती मिळाली. यामध्ये बीए भाग १ मधील विद्यार्थिनी हर्षदा हणमंत पाटील, सृष्टी तात्यासाहेब कोपुरी, श्रेया राजगोंडा पाटील यांचा समावेश आहे. या यशाबद्दल वरील खेळाडूंचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले. खेळाडूंना जिमखाना विभागातील प्रा. एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण यांचे मार्गदर्शन मिळाले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात काव्यवाचनातून महानोरांना अभिवादन

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाकडून रानकवी ना. धों. महानोर यांच्या निवडक कवितांच्या वाचनातूनच त्यांच्या स्मृतीला आज अभिवादन करण्यात आले. विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी महानोर यांच्या मराठी कवितेतील त्यांच्या कवितेचे महत्त्व सांगितले. आपल्या मनोगतामध्ये त्यांनी महानोर यांच्या काव्यलेखनाने मराठी काव्यविश्व कसे समृद्ध केले आहे ते सांगितले.

विद्यार्थ्यांना महानोर यांच्या काव्यप्रवासाचा आणि जीवनप्रवासाचा आढावा घेणारा माहितीपट दाखवण्यात आला. विभागातील मंदार पाटील, गायत्री, स्नेहल पाटील, सौरभ मुदाळे, राहुल अनपट, शीतल पटले, पल्लवी साळुंखे, शिवाजी देसाई, सुस्मिता खुटाळे यांनी कविता वाचन केले. यावेळी डॉ. अरुण शिंदे, गोमटेश्वर पाटील, सुखदेव एकल, रवी लोंढे, राजेश पाटील उपस्थित होते.

तरुण भारत

# १०४८ विद्यार्थ्यांनी दिली बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजीची परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. शुक्रवार दि. ४ रोजी Bachelor of Technology या अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन पध्दतीने सुरळीत पार पडल्या. विविध महाविद्यालयामध्ये एकूण १०४८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेत गैरप्रकारावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केले आहे.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात ना. धो. महानोर यांना श्रद्धांजली

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाच्यावतीने ना. धो. महानोर यांच्या कविता वाचनातूनच स्मृतीला अभिवादन केले. विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी महानोर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत मराठी कवितेतील त्यांच्या कवितेंचे महत्त्व सांगितले. डॉ. रणधीर शिंदे यांनी ना. धो. महानोर यांच्या काही आठवणी सांगितल्या. त्यांच्या कविता आणि इतरही लेखनाचे अनेक वैशिष्ट्ये सांगितली. विद्यार्थ्यांना ना. धो. महानोर यांच्या काव्यप्रवासाचा आणि जीवनप्रवासाचा आढावा घेणारा माहितीपट दाखवण्यात आला. मंदार पाटील यांनी महानोर यांच्या काही गाजलेल्या गीतांचे गायन केले. गायत्री, स्नेहल पाटील, सौरभ मुदाळे, राहुल अनपट, शीतल पटले, पल्लवी साळुंखे, शिवाजी देसाई व सुस्मिता खुटाळे यांनी कविता वाचन केले. यावेळी डॉ. अरुण शिंदे व डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. सुखदेव एकल, रवी लोंढे व राजेश पाटील आदी उपस्थित होते.